# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ.

(स्वायत्त) (ISO: ९००१:२००८) (ISO/IES : २७००१-२००५)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, चौथा मजला, ४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

दूरध्वनी क्र.: २६४७१२५५ (का.)/२६४७ ०९१६ (वै.) फॅक्स ९१-०२२-२६४७३९८०

Email : secretary@msbte.com Web : www.msbte.com


जा.क्र.मरातंशिमं/का-५०/अभ्यासक्रम/२०१७/ 6097 दिनांक: - 6 MAY 2017

**महत्वाचे परिपत्रक:**

**विषय: महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळामार्फत नविन सुधारीत पदविका अभ्यासक्रमाची ('I' Scheme) शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून अंमलबजावणी करणेबाबत**

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने नविन अभ्यासक्रम सुधारणा करताना नॅशनल बोर्ड ऑफ अक्रीडीटेशन (National Board of Accreditation) या शिखर संस्थेने अभियांत्रिकी अभ्यासक्रमाकरिता OBE (Outcome Base Education) नॉर्म्स अनिवार्य केले असल्याने या नॉर्म्सवर आधारीत अभ्यासक्रम, सुधारण्याची प्रकिया सुरु केली.

अभ्यासक्रम सुधारणा प्रकियेत मंडळाने तंत्रनिकेतनातील अनुभवी शिक्षकांना सहभागी करुन घेतले. अभ्यासक्रम सुधारणा प्रकिये दरम्यान अनेक औद्योगिक क्षेत्रांमधिल तंज्ञांचा सहभाग करुन त्यांच्या गरजा व माजी विद्यार्थ्यांच्या अपेक्षा याबाबत त्यांचे अभिप्राय प्राप्त केले. सर्व अभिप्रायांचे विष्लेषण करुन त्यानुसार शाखा विषय, अभियांत्रिकी / तंत्रज्ञानांचे विषय, व्यवस्थापन विषय निश्चित करण्यात आले व एकूण ६ सत्रामध्ये (६ Semesters) या विषयांची मांडणी करण्यात आली व त्यानुसार १८ पदविका अभ्यासक्रमाचे आकृतीबंध (Structures) तयार करण्यात आले. तसेच प्रत्येक शाखानिहाय, सत्रनिहाय व विषयनिहाय कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या व त्यानुसार १८ पदविका अभ्यासक्रमाचे प्रथम सत्र व व्दितीय सत्रातील सर्व विषयांचा पाठ्यक्रम तयार करण्यात आले.

या सुधारित अभ्यासक्रमामध्ये प्रत्येक शाखेमध्ये विद्यार्थ्यांसाठी औद्योगिक प्रशिक्षण (In-plant Training) व प्रत्येक विषयांतर्गत विद्यार्थ्यांना Micro Project अनिवार्य केलेले आहेत. सदर अभ्यासक्रमामध्ये Progressive Assessment वर विषेश भर देण्यात आलेला असून समुहानुसार Elective विषयांचा अंर्तभाव करण्यात आलेला आहे.

असे तयार केलेले १८ पदविका अभ्यासक्रमाचे आकृतीबंध (Structures) तसेच प्रथम व व्दितीय सत्रामधिल विविध विषयांचे पाठ्यक्रम (Detail Contents) मंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. नविन अभ्यासक्रमाच्या प्रथम सत्राची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून सुरु होणार आहे यांची नोंद घ्यावी.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
म. रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

Z:\Pramod\Marathi Letter-ISM.docx